दाखल दिनांक : २९—०५—२००८

नोंदणी दिनांक : २९—०५—२००८

न्यायनिर्णय दिनांक : ३०—०१—२०१४

कालावधी : ०५वर्ष—०८म.—०१दिवस

**न्यायदंडाधिकारी,प्रथम वर्ग,न्यायालय क्र.२ भूम यांच्या न्यायालयात**

( पीठासीन अधिकारी ए.एन. माने )

**नियमित फौजदारी खटला क्र.७६/२००८** **निशाणी नं.५७**

महाराष्ट्र शासन तर्फे,
फिर्यादी अमोल दिगांबर
कदम, वय २२ वर्ष,
धंदा फोटोग्राफर, रा. भूम,
ता. भूम, जिल्हा उस्मानाबाद.

.. फिर्यादी

—**विरूध्द**—

भारत बापू काळे,
वय २६ वर्षे, धंदा मजूरी,
रा. पारधीपिडी भूम, ता. भूम,
जि. उस्मानाबाद.

.. आरोपी

..

**आरोप**:— भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९,४२९,२०१ सह ३४ अन्वये.

..

श्री. ए.के. मोटे, सहाय्यक सरकारी विधिज्ञ फिर्यादीकरीता.

श्री. आर.बी. पाटील, विधिज्ञ आरोपी करीता.

..

## <u>न्या य नि र्ण य</u>

( दिनांक ३० जानेवारी, २०१४ रोजी घोषीत )

१ प्रस्तुतचे प्रकरणात आरोपीच्या विरूध्द भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९,४२९,२०१ सह ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

२ अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालील प्रमाणे:

दिनांक ३१—०१—२००८ रोजी रात्री तीन ते पाच वाजण्याचे सुमारास लाला सोपान काळे व भारत बापू काळे रा. पारधीपिडी भूम हा.मु. वंजारवाडी शिवार यांनी फिर्यादी अमोल कदम याच्या घरासमोरील कोठयात बांधलेला रेडा चोरुन नेवून वंजारवाडी शिवारात लाला सोपान काळे, भारत बापू काळे, मिराबाई भ्र. लाला काळे व वनमाला उर्फ मालनबाई भ्र. लाला काळे यांनी मिळून कापून मांस वाटून घेवून हाडोंग्री व वंजारवाडी शिवारात पातेल्यात मांस शिजवून खात होते व उरलेले मांस शेतातील तुराटयावर व खडकावर वाळू घातलेले होते. रेडयाचे मांस कापण्यासाठी वापरलेला सुरा व विळया हया त्याठिकाणीच होत्या, त्यांनी चोरुन आणलेला रेडा लागलीच कापून त्याची विल्हेवाट लावली आहे अशी फिर्याद फिर्यादी अमोल कदम याने दिनांक ३१—०१—२००८ रोजी पोलीस स्टेशन, भूम येथे दिली. फिर्यादीवरून गुन्हा रजि. नं.०७/२००८ भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९, ४२९, २०१ सह ३४ अन्वये नोंदवून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल कांबळे, ब.नं. ७५२ यांनी केला. तपासात तपासीक अधिकारी यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि तपास पूर्ण झालेनंतर आरोपींच्याविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

३ त्यानंतर सदरचे खटल्यामध्ये आरोपी क्र.१ व २ यांचा खटला वेगळा चालवून निशाणी ३३ वरील न्यायनिर्णयान्वये आरोपी लाला सोपान काळे व मिराबाई काळे यांना भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९,४२९,२०१ सह ३४ या गुन्हातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. व सदरचा खटला हा आरोपी क्र.२ भारत काळे व वनमाला उर्फ मालनबाई यांच्याविरुध्द चालू ठेवण्यात आलेला आहे. त्यांनतर सदर खटल्यामध्ये भारत काळे हा हजर झाल्याने त्यांचा खटला वेगळा करुन भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९,४२९,२०१ सह ३४ अन्वये दोषारोप निशाणी ४६ वर निश्चित करुन ते त्यांना मराठी भाषेत वाचून दाखविला असता तो त्यांनी नाकबूल करुन खटला पुढे चालविण्याची मागणी केली. त्यानंतर अभियोग पक्षाने एक साक्षीदार तपासला.

४ अभियोग पक्षाची हकीकत व कोर्टापुढे आलेल्या एकुण पुराव्यावरून माझे विवेचनाकरीता खालील मुद्दे निघत असून त्यांचे निष्कर्ष मी खालील कारणाकरीता नोंदवित आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- |
| १ दिनांक ३१—०१—२००८ रोजी रात्री ३.०० ते ५.०० वाजण्याच्या सुमारास शिवशंकरनगर भूम ता.भूम येथे आरोपी भारत बापू काळे याने इतर आरोपीसह संगनमत करुन त्यांचे सामाईक उद्देशाकरीता फिर्यादी अमोल दिगांबर कदम याचे मालकीची म्हैस ज्याचे परवानगी विना चोरुन नेवून भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९ सह ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष शाबीत करते काय? | .. नाही. |
| २ सदर घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी भारत बापू काळे याने इतर आरोपींसह संगनमत करुन फिर्यादी अमोल दिगांबर कदम याचे मालकीची | |

म्हैस किंमत रु.१०,०००—०० हीस जिवे मारल्यामुळे भारतीय दंड विधान संहिता कलम ४२९ सह ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष शाबीत करते काय? .. नाही.

३ सदर घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी भारत बापू काळे याने इतर आरोपींसह संगनमताने फिर्यादी अमोल दिगांबर कदमच्या मालकीची म्हैस हिस जिवे मारुन तिचे मांस नष्ट करुन भारतीय दंड विधान संहिता कलम २०१ सह ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष शाबीत करते काय? .. नाही.

४ अंतिम आदेश काय? .. आरोपी यांना दोषमुक्त केले.

## **<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुददे क्र.१ ते ४ करीता</u>**:—

५ सदरचे मुद्दे हे एकमेकांशी सलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मी सदर मुद्दे एकत्रीत विचारासाठी घेतले आहेत. आरोपी यांचा भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९, ४२९,२०१ सह ३४ अन्वये गुन्हा संशयापलीकडे शाबीत करण्याकरीता अभियोग पक्षाने केवळ एक साक्षीदार तपासला आहे. साक्षीदार क्र.१ अमोल दिगंबर कदम यास निशाणी ४९ वर तपासले आहे.

६ फिर्यादी साक्षीदार क्र.१ अमोल दिगंबर कदम याने शपथेवर असे कथन केले आहे की, घटना चार वर्षापुर्वी रात्री इंदिरानगर येथे कोठयावर घडली. संध्याकाळी त्याने त्याचे मालकीचे रेडा व म्हशीस वैरण पाणी केले व दुस—या दिवशी सकाळी त्याचा रेडा चोरीस गेला. सदरचा रेडा हा काळया रंगाचा असून त्याची किंमत १०,०००—०० होती. त्याला कुराणात रेडा कापलेला दिसला. त्याठिकाणी कापण्याचे काम चालू होते. तो त्याठिकाणी गेला असता सर्व आरोपी

त्यांना पाहून गेले, त्यानंतर त्याने भूम पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. त्याने त्याची फिर्यादीवरील सही ओळखली, फिर्यादीस निशाण २९ देण्यात आले. पुढे कथन केले की, त्याला आणखी केसबाबत कांहीही सांगावयाचे नाही. सदर साक्षीदार यांचा आरोपी यांनी उलट तपास घेतला असता सदर साक्षीदार यांनी असे कबुल केले आहे की, त्याला घटनेची तारीख वार सांगता येत नाही. त्याला रेडा कोणी नेला हे त्याला सांगता येत नाही. तसेच कबुल करतो की, रेडा त्याचा होता किंवा कसे हे तो सांगु शकत नाही. आरोपी आणि त्याचे मिटलेले आहे. पुढे कबुल करतो की त्याने कोर्टात तडजोड दाखल केलेली आहे व त्यावर त्याची सही आहे. वरील फिर्यादी यांचा तोंडी पुरावा व कबुली जबाब पाहता असे दिसून येते की सदर साक्षीदार हा कबुल करतो की, रेडा कोणी चोरुन नेला हे त्याला सांगता येत नाही. अभियोग पक्षास पुरेशी संधी देवूनही त्यांनी इतर स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत. तसेच सदर साक्षीदार यांनी त्यांचे तोंडी पुराव्यात आरोपी भारत याने सदरचा रेडा चोरुन नेवून तो त्यांनी कापून खाल्ला असे कथन केले नाही, त्यामुळे आलेल्या सदर साक्षीदार यांचा तोंडी पुरावा हा आरोपी यांचा भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९,४२९,२०१ सह ३४ अन्वये गुन्हा संशयापलीकडे शाबीत करण्याइतपत सबळ पुरावा नाही. वरील सर्व बाबीवरुन असे दिसते की, अभियोग पक्षास आरोपी यांनी फिर्यादी यांचा रेडा चोरुन नेवून तो कापून खाल्ला ही बाब शाबीत करण्यास अपयश आलेले आहे. त्यामुळे आरोपी यांचा भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९,४२९,२०१ सह ३४ अन्वये गुन्हा संशयापलीकडे शाबीत होत नाही. म्हणून मी मुद्दे प्रश्न क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुददा क्र.४ चे उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आ दे श**

१ आरोपी भारत बापू काळे, रा. पारधीपिडी भूम, ता. भूम. जि. उस्मानाबाद यास भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९,४२९,२०१ सह ३४ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार दोषमुक्त

करण्यात येत आहे.

२ आरोपी यांचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३ निशाणी १ वरील आदेशानुसार फरार आरोपी वनमाला उर्फ मालनबाई लाला काळे हिच्याविरुध्द प्रकरण पुढे चालू ठेवण्यात येत आहे.

(खुल्या न्यायपिठासमोर जाहिर)

स्वाक्षरित/—

दिनांक : ३०—०१—२०१४

( ए.एन. माने )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
न्यायालय क्र.२, भुम.